# ठाणे भारत सहकारी बँक लि.

शेड्यूल्ड बँक

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सर्व सभासदांना सूचना देण्यात येते की, बँकेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक १८.०९.२०२१ रोजी सकाळी ९.३० वाजता सहयोग मंदिर, तळ मजला, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२ येथे **दृक्-श्राव्य माध्यमातून (Video Conference)** द्वारे आयोजित करण्याचे ठरले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजीचे पत्र क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२४/१३-स नुसार या सभेस **कोणत्याही सभासदांस प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार नाही.** सभासदांना **https://nsdl-livewebcast.com/18092021/tbsbl/** या लिंक (Link) द्वारे या सभेत सहभागी होता येईल. सदरहू सभा खालील कामकाजाचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
**श्रीराम पेजावर**
मुख्य कार्यकारी अधिकारी (Interim)

दिनांक : ०२.०९.२०२१

## सभेपुढील विषय

१) दि.३०.०३.२०२१ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

२) दि.३१.०३.२०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला जमाखर्च व ताळेबंद पत्रकास मंजूरी देणे व सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४) सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ अशा तीन आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीस मंजूरी देणेबाबतचे अधिकार संचालक मंडळास देणेबाबत.

५) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ४९ अन्वये वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली संशयित व बुडीत कर्ज खात्यांतील वसुल न झालेली व्याजाची व मुद्दलाची रक्कम येणे बाकीस, वसुलीचे सर्व अधिकार अबाधित राखुन निर्लेखित करण्यासंबंधीचे सन २०२१-२२ साठीचे अधिकार संचालक मंडळाला देणेबाबत.

६) सामोपचार कर्ज फेडीच्या अंतर्गत अर्ज केलेल्या कर्जदारांची कर्ज खात्यांतील व्याजाची काही रक्कम माफ करण्यास मंजुरी देणे बाबत.

७) बँकेच्या सन २०१९-२० या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.

८) सन २०२१-२२ साठी तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्तीस (परिशिष्ठ ‘ब’ प्रमाणे) मंजूरी देणेबाबत.

१०) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

११) बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्तीसाठी RBI परिपत्रक RBI/2021-22/60 DOR.GOV.REC.२५/१२.१०.०००/२०२१-२२, दि. २५ जून २०२१ नुसार रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नावांची नोंद घेणे.

१२) ४३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस जे सक्रीय सभासद अनुपस्थित असतील त्यांची रजा मंजूर करणेबाबत.

१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर विचार करणे.

**सूचना :-**

१) गणसंख्येअभावी वर उल्लेखिलेल्या वेळेस सभा सुरू न झाल्यास ‘‘स्थगित सभा’’ त्याच दिवशी त्याच संकेत स्थळावर सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेत विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचा विचार केला जाईल. सदर सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) ज्या सभासदांना **दृक्-श्राव्य माध्यमातून (Video Conference)** द्वारे होणाऱ्या वार्षिक सभेत काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील किंवा कोणत्याही प्रकारची माहिती हवी असल्यास, त्यांनी दि.१३-०९-२०२१ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत त्यांच्या सूचना अथवा प्रश्न लेखी स्वरूपात द्यावेत. दि.१३-०९-२०२१ पर्यंत दिलेल्या मुदतीत लेखी स्वरूपात आलेल्या सूचना अथवा प्रश्नांचीच दखल घेण्यात येईल. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३) सभासदांनी सभेच्या नमूद वेळेच्या ३० मिनिटे आधी **Log-in** करावे.

४) सभासदांना विनंती करण्यात येते की ज्यांची भाग रक्कम रु.१,५००/- पेक्षा कमी आहेत त्यांनी आवश्यकत्या वाढीव रकमेचा भरणा करून किमान ६० भागांची रक्कम रु.१,५००/- पर्यंत लवकरात लवकर पूर्ण करावी. तसेच ज्यांची ठेव रू.७,०००/- आहे किंवा कर्ज रु.१,००,०००/- पर्यंत घेतले आहेत आणि जे किमान पाच वर्षातून एकदा तरी वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर राहतील, त्यांचाच मतदानाचा हक्क अबाधित राहील.

५) भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी / खातेदारांनी के.वाय.सी. (KYC) बाबतच्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची पूर्तता त्वरित करून घ्यावी. त्याकरिता आपल्या शाखेत संपर्क करावा.

६) सभासदांनी वार्षिक अहवालाची प्रत जवळची शाखा/केंद्रीय कार्यालय/नोंदणीकृत कार्यालय येथून घेऊन जावी, किंवा **www.tbsbl.com** या बँकेच्या वेबसाइटवर उपलब्ध होईल.

७) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्यासाठी आपला सभासद क्रमांक, नाव व मोबाईल क्रमांक members@tbsbl.com या E-mail address वर किंवा बँकेच्या शेअर्स विभाग अथवा कोणत्याही शाखेत कळवावे हि विनंती.

**टीप : सदर सभेनंतर सभासदांना सहकार शिक्षणाबाबत दृक्-श्राव्य माध्यमातून (Video Conference) द्वारे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, तरी सभासदांनी याचा लाभ घ्यावा.**

---

**नोंदणीकृत कार्यालय :** ‘शततारका’, बाजी प्रभू देशपांडे मार्ग, विष्णुनगर, नौपाडा, ठाणे (प.)-४००६०२. फोन : २५३३३६०४, २५४२९४३२/३३
**केंद्रीय कार्यालय :** सहयोग मंदिर, तळ मजला, सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.)-४००६०२. फोन : २५४०८०७६/२५३३४९२९ फॅक्स : २५३३३६४५
**www.tbsbl.com**